२०१८-२०१९ या शैक्षणिक वर्षापासून +२ स्तरावरील द्विलक्षी व्यवसाय अभ्यासक्रम नवीन/ अधिकच्या तुकडयांमध्ये कायम स्वरूपी विनाअनुदान तत्वावर सुरू करण्यास मान्यता देणेबाबत..

महाराष्ट्र शासन

कौशल्य विकास व उद्योजकता विभाग

शासन निर्णय क्रमांकः व्हीओसी-२०१७/प्र.क्र.१०९ (भाग-३) /व्यशि-४,

मंत्रालय विस्तार (खोली क्र.४३५), ४ था मजला,
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : ०२ फेब्रुवारी, २०१८.

संदर्भ :

१) उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्रमांक : व्हिओसी-२०११/११४७/प्र. क्र. ५/व्यशि-४, दिनांक १३/१/२०११

२) संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्रमांक : ८/व्हिओसी/२२०३/२०१६-१७/२०७,दि.१६/९/२०१७

३) संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्रमांक : ८/व्हिओसी/२२०३/२०१७-१८/२१०,दि.२२/९/२०१७

४) संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्रमांक : ८/व्हीओसी/२२०३/२०१७-१८/२१५, दिनांक ६/१०/२०१७.

५) संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्रमांक : ८/व्हीओसी/२२०३/२०१७-१८/२१८, दिनांक ३/११/२०१७.

६) संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्रमांक : ८/व्हीओसी/२२०३/२०१७-१८/०१, दिनांक ४/१/२०१८.

प्रस्तावना :

डॉ. कोठारी आयोगाच्या १९६४ च्या शिफारशीनुसार अधिकाधिक युवकांना विविध व्यवसायांचे प्रशिक्षण देण्याच्या दृष्टीने १९७८-७९ पासून राज्यात व्यवसाय विषयांची ३०% व्याप्ती असलेले, +२ स्तरावरील द्विलक्षी व्यवसाय अभ्यासक्रम सुरू करण्यांत आले. सद्य:स्थितीत तांत्रिक/ वाणिज्य/ कृषी/मत्स्य या गटातील एकूण १६ द्विलक्षी व्यवसाय अभ्यासक्रम राबविण्यात येतात. सदर अभ्यासक्रम घेणा-या विद्यार्थ्यांना अभियांत्रिकी शाखेमध्ये प्रवेशाच्या चांगल्या संधी उपलब्ध आहेत. त्याच बरोबर अभियांत्रिकी विद्याशाखेमधील पदविकेच्या (Diploma) व्दितीय वर्षामध्ये प्रवेशाची सुविधा उपलब्ध असल्यामुळे या अभ्यासक्रमाकडे विद्यार्थ्यांचा मोठा प्रतिसाद आहे. सदर व्यवसाय अभ्यासक्रमांची वाढती मागणी लक्षात घेता शैक्षणिक वर्ष २०१७-२०१८ पासून +२ स्तरावरील द्विलक्षी व्यवसाय अभ्यासक्रमाच्या अधिकच्या/नविन तुकडया कायमस्वरूपी विना अनुदानित तत्वावर सुरू करण्याकरीता इच्छूक संस्थाकडून प्राप्त झालेल्या अर्ज/प्रस्तावांची संचालनालयस्तरावर छाननी करण्यांत आली. त्यानुसार संचालनालयाने उपरोक्त संदर्भ क्र. २ येथील पत्रान्वये सादर केलेल्या प्रस्तावामध्ये विहित निकष/मानकांची पूर्तता

करणाऱ्या +२ स्तरावरील द्विलक्षी व्यवसाय अभ्यासक्रमाच्या मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद, अमरावती व नागपूर विभागातील एकूण ५७ अशासकीय संस्थांमधील ८२ नवीन/ अधिकच्या तुकडयांमध्ये कायमस्वरूपी विनाअनुदानित तत्वावर शैक्षणिक वर्ष २०१७-१८ पासून व्यवसाय अभ्यासक्रम सुरु करण्यास मान्यता देण्याची शिफारस शासनास केलेली आहे. तथापि, सन २०१७-१८ हे शैक्षणिक वर्ष आता समाप्त होत असल्यामुळे सदर संस्था २०१७-१८ या शैक्षणिक वर्षापासुन त्यांनी मागणी केलेले व्यवसाय अभ्यासक्रम सुरु करु शकणार नाहीत. यास्तव सदर संस्थांना त्यांनी मागणी केलेला व्यवसाय अभ्यासक्रम त्यांनी मागणी केलेल्या तुकडयांमध्ये सन २०१७-१८ ऐवजी सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षापासून सुरु करण्यास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

<u>शासन निर्णय:</u>

शासन आता याव्दारे, राज्यातील +२ स्तरावरील व्दिलक्षी व्यवसाय अभ्यासक्रम राबविणा-या मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद, अमरावती व नागपूर विभागातील खालील तक्त्यामध्ये नमूद करण्यात आलेल्या ५७ अशासकीय संस्थांना त्यांच्या नावासमोर नमूद करण्यात आलेला व्यवसाय अभ्यासक्रम त्यांच्या नावासमोर नमूद करण्यात आलेल्या तुकडयांमध्ये विनाअनुदानित तत्वावर शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासून सुरु करण्यासाठी पुढील अटीं व शर्तींच्या अधिन राहून शासनाची मान्यता देण्यांत येत आहे:-

अ. क्र.	संस्थेचे नाव व पत्ता	संस्थेने मागणी केलेले व्यवसाय अभ्यासक्रम	मागणी केलेल्या तुकडया (प्रत्येकी ५० विद्यार्थी)
१	२	३	४
	मुंबई विभाग		
१	आदर्श विकास मंडळाचे बाल विद्यामंदिर व कर्मवीर भाऊराव पाटील कनिष्ठ महाविद्यालय, रोड न. १६ नेहरू नगर वागले इस्टेट, फायर ब्रिग्रेडच्या मागे, ठाणे	कॉम्प्युटर सायन्स	१ तुकडी
२	श्रीमती श्यामपतीदेवी मिश्रा एज्यु.ट्रस्ट आयरीस ज्युनिअर कॉलेज ऑफ सायन्स अँड कॉमर्स, धानीव बाग नालासोपारा (पु.) ता.वसई जि.पालघर - ४०१२०९	कॉम्प्युटर सायन्स	१ तुकडी
३	मदर तेरेसा इंग्लिश सेकेंडरी स्कुल अँड ज्युनिअर कॉलेज ऑफ कॉमर्स अँड सायन्स चारकोप,कांदीवली (प), मुंबई	कॉम्प्युटर सायन्स	१ तुकडी
४	पेस एज्युकेशन ट्रस्ट, पेस ज्युनिअर न्यु.सायन्स कॉलेज, नेरुळ १३ व १४ अमृत सदन सेक्टर २२ नेरुळ(प) ठाणे	इलेक्ट्रिकल मेन्टेनन्स	३ तुकडया
		कॉम्प्युटर सायन्स	२ तुकडया

५	पेस एज्युकेशन ट्रस्ट, पेस ज्युनिअर सायन्स कॉलेज, दादर प्लॉट नंबर ४४६ भवानी शंकर रोड, दादर (प) मुंबई - २८	इलेक्ट्रिकल मेन्टेनन्स	१ तुकडी
		कॉम्प्युटर सायन्स	२ तुकडया
६	पेस एज्युकेशन ट्रस्टचे ३०२, ३ रा मजला, आर एन ए प्रिंग सी विंग कामा रोड,अंधेरी (प)मुंबई -४०००५८	इलेक्ट्रिकल मेन्टेनन्स	३ तुकडया
		कॉम्प्युटर सायन्स	३ तुकडया
७	पेस ज्युनिअर सायन्स कॉलेज बोरीवली जयभद्रा विला, एस व्ही रोड, बोरीवली (प) मुंबई - ४०० ०९२	इलेक्ट्रिकल मेन्टेनन्स	२ तुकडया
		कॉम्प्युटर सायन्स	३तुकडया
८	पेस एज्युकेशन ट्रस्टचे पेस ज्युनिअर सायन्स कॉलेज पवई ३ रा मजला,कच्छी भवन,जैन मंदिर जवळ मुंबई ७६	इलेक्ट्रिकल मेन्टेनन्स	१ तुकडी
		कॉम्प्युटर सायन्स	२ तुकडया
९	के.एल ई .सोसायटीज सायन्स अँड कॉमर्स कॉलेज कळंबोली सेक्टर १, प्लॅट न २९ ता पनवेल, जि. .रायगड.	इलेक्ट्रॉनिक्स	१ तुकडी
		कॉम्प्युटर सायन्स	१ तुकडी
		बॅकीग	१ तुकडी
		ऑफीस मॅनेजमेट	१ तुकडी
१०	राजस्थान रीलीफ सोसायटीचे नवजीवन विद्यालय हायस्कूल, मालाड (पूर्व), मुंबई -६७	कॉम्प्युटर सायन्स	१ तुकडी
११	दि. न्यु. सार्वजनिक एज्युकेशन सोसायटीचे ज्यु. कॉलेज ऑफ सायन्स, कांदिवली (पूर्व), मुंबई १०१	कॉम्प्युटर सायन्स	१ तुकडी
एकूण ११ संस्था		**एकूण ३२ तुकडया**	
पुणे विभाग			
१२	श्री माऊली शिक्षण प्रसारक व समाजसेवा मंडळ टेंभुर्णी लक्ष्मी आनंद उच्च माध्यमिक विद्यालय (ज्यु. कॉलेज सायन्स) टेंभुर्णी,ता. माढा, जि. पुणे	क्रॉप सायन्स	१ तुकडी
१३	शहाजीराव पाटील विकास प्रतिष्ठाणचे एस. बी. पाटील ज्युनिअर कॉलेज,वनगळी,ता. इंदापूर,जि. पुणे	क्रॉप सायन्स	१ तुकडी
१४	अभिषेक आर्टस ॲण्ड कॉमर्स ॲण्ड सायन्स ज्युनिअर कॉलेज, प्लॉट न. १२८, जी. ब्लॉक, एम. आय. डी. सी. शाहूनगर, चिंचवड, पुणे	कॉम्प्युटर सायन्स	१ तुकडी
१५	एशियन ज्यु. कॉलेज ऑफ सायन्स, कॉमर्स ॲण्ड आर्टस, २८/१५/१६ न-हे धायरी रोड,परी कंपनी चौक, ता. हवेली, जि. पुणे-४१	कॉम्प्युटर सायन्स	१ तुकडी
एकूण ४ संस्था		**एकूण ४ तुकडया**	

नाशिक विभाग			
१६	ओकार एज्युकेशन सोसायटीचे ना .भा.तांबे ज्युनि. कॉलेज,ता. जामखेड जि .अहमदनगर	क्रॉपसायन्स	१ तुकडी
१७	ओम शिवकृपा शिक्षण प्रसारक मंडळ औरंगाबाद संचलित आदर्श ज्युनिअर कॉलेज गायकवाड, जळगाव, ता. शेवगाव, जि. अहमदनगर	क्रॉपसायन्स	१ तुकडी
१८	रयत शिक्षण संस्थेचे रा. ब. नारायणराव बोरावके कॉलेज, श्रीरामपूर, जि. अहमदनगर	क्रॉपसायन्स	१ तुकडी
१९	श्रीगणेश शिक्षण संस्था, कोपरगाव, संचलित श्रीगणेश ज्युनिअर कॉलेज,का-हाळे,ता.राहाता,जि. अहमदनगर	कॉम्प्युटर सायन्स	१ तुकडी
एकूण ४ संस्था		**एकूण ४ तुकडया**	
औरंगाबाद विभाग			
२०	सरोश ज्युनिअर कॉलेज ऑफ सायन्स , प्लॉट नंबर ६१, मोतीवाला नगर औरंगाबाद	इलेक्ट्रॉनिक्स	१ तुकडी
		हॉर्टिकल्चर	१ तुकडी
२१	महाराष्ट्र बहुउददेशिय सामाजिक संस्था संचलित प्रतापगड क्रॉप सायन्स कॉलेज वार्ड नं १४ नागेवाडी, जालना	क्रॉप सायन्स	२ तुकडया
२२	रामचंद्र सांस्कृतिक क्रिडा मंडळ, जालना संचलित भारत उच्च माध्यमिक विद्यालय जालना, भक्त नगर विद्युत कॉलनी शेजारी जालना	क्रॉप सायन्स	१ तुकडी
२३	महाराष्ट्र शिक्षण प्रसारक संस्था, किल्लारी ता औसा संचलित महाराष्ट्र माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय किल्लारी ता. औसा, जि. लातूर	क्रॉप सायन्स	१ तुकडी
२४	श्री.विश्वेश्वर शिक्षण प्रसारक मंडळ आलमला, ता.औसा जि.लातूर संचालित ब्ल्यु बर्ड इंटरनॅशनल स्कूल ॲण्ड ज्युनिअर कॉलेज, आलमला, ता.औसा. जि. लातूर	क्रॉप सायन्स	१ तुकडी
२५	डॉ. होमी भाभा शिक्षण प्रसारक मंडळ, अहमदपूर संचलित कस्तुरबा गांधी कनिष्ठ महाविद्यालय, व्यंकटेशनगर, अहमदपूर, जि. लातूर	इलेक्ट्रॉनिक्स १ तुकडी बंद करुन त्याऐवजी क्रॉप सायन्स	१ तुकडी
२६	तेजस्वी शिक्षण संस्कार बहुउद्देशिय सेवाभावी संस्था, तरोडा (बु) संचलित निर्मल विद्यालय प्राथमिक ते उच्च माध्यमिक मेंढला(बु.) ता. अर्धापूर, जि. नांदेड	कॉम्पुटर सायन्स	१ तुकडी

२७	श्री सेवादास शिक्षण प्रसारक मंडळाचे वसंतराव नाईक कनिष्ठ महाविद्यालय,वसरणी ता.जि.नांदेड	क्रॉप सायन्स	१ तुकडी
२८	लोकमान्य ग्रामीण विकास संस्था संचलीत लोकमान्य कनिष्ठ महाविद्यालय,लोहा,ता.लोहा, जि. नांदेड	क्रॉप सायन्स	१ तुकडी
२९	श्री शिवाजी मोफत एज्यूकेशन सोसायटी कंधारचे श्री संत गाडगे महाराज माध्यमीक व उच्च माध्यमीक विद्यालय, लोहा ता.लोहा जि.नांदेड	क्रॉप सायन्स	१ तुकडी
३०	प्रगत महाराष्ट्र मंडळ,देगलूर द्वारा संचलीत ज्ञानसरस्वती कनिष्ठ महाविद्यालय,देगलूर ता.देगलूर, जि.नांदेड	क्रॉप सायन्स	१ तुकडी
३१	श्रीकृष्ण शिक्षण प्रसारक मंडळ, कुंटूरतांडा संचलीत वि.जा.भ.ज. कनिष्ठ महाविद्यालय , कुंटूरतांडा ता.नायगाव जि.नांदेड	क्रॉप सायन्स	१ तुकडी
३२	माऊली बहूउद्येशीय संस्था सेवाभावी ,इस्लापुर संचलीत संत ज्ञानेश्वर उच्च माध्यमीक विद्यालय, इस्लापुर, ता.किनवट, जि.नांदेड	क्रॉप सायन्स	१ तुकडी
३३	फुले समाजसुधारक समिती संचलीत शाहीर अण्णाभाऊ साठे कनिष्ठ महाविद्यालय,मुखेड ता.मुखेड, जि.नांदेड	क्रॉप सायन्स	१ तुकडी
३४	हदगाव तालुका शिक्षण प्रसारक मंडळ हदगाव संचलीत श्री दत्त कला, वाणिज्य व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय,हदगाव ता.हदगाव जि.नांदेड	क्रॉप सायन्स	१ तुकडी
३५	श्री शिवाजी मोफत एज्यूकेशन सोसायटी कंधारचे श्री शिवाजी उच्च माध्यमीक (उर्दू/ मराठी) विद्यालय, कंधार, ता.कंधार, जि.नांदेड	क्रॉप सायन्स	१ तुकडी
३६	श्री संत नारायणगिरी महाराज सेवाभावी संस्था संचलीत महात्मा फुले सेमी इंग्लिश स्कुल व ज्युनिअर कॉलेज, वासरी ता.मुदखेड जि.नांदेड	क्रॉप सायन्स	१ तुकडी
३७	तिरुमला फाऊंडेशन संचलीत सिंधू ज्युनिअर कॉलेज, देगलूर ता.देगलूर जि.नांदेड	क्रॉप सायन्स	१ तुकडी
३८	गोदावरी मनार चॅरिटेबल ट्रस्ट शंकरनगर ता.बिलोली संचलीत गोदावरी मनार पब्लिक स्कुल व ज्युनिअर कॉलेज,शंकरनगर ता.बिलोली, जि.नांदेड	क्रॉप सायन्स	१ तुकडी

३९	बळीराम बहूउद्येशीय शिक्षण संस्था,जालना संचलीत सिध्देश्वर कला व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय, बिलोली, ता.बिलोली जि.नांदेड	क्रॉप सायन्स	१ तुकडी
४०	सौ.चंद्रकलाबाई माणिकराव देशमुख बहुउद्देशीय सेवाभावी संस्था संचलीत चंद्रमा पब्लिक स्कुल ॲण्ड ज्युनिअर कॉलेज, बा-हाळी ता.मुखेड जि.नांदेड	क्रॉप सायन्स	१ तुकडी
४१	बालक शिक्षण प्रसारक मंडळ मरवाळी तांडा संचलित उच्च माध्यमिक आश्रमशाळा मरवाळी, तांडा, ता . नायगांव, जि. नांदेड	क्रॉप सायन्स	१ तुकडी
४२	अडत व्यापार शिक्षण संस्था , देगलुर संचलित, देगलुर महाविद्यालय देगलुर ता .देगलुर जि. नांदेड	ॲनिमल सायन्स ॲंड डेअरी	१ तुकडी
४३	मातोश्री शिक्षण प्रसारक मंडळ मांडाखळी जि.परभणी संचलीत छत्रपती शिवाजी कनिष्ठ महाविद्यालय, मानवत रोड ता.मानवत जि.परभणी	क्रॉप सायन्स	१ तुकडी
४४	एकात्मीक ग्रामीण आणि कृषी विकास संचलीत सरस्वती कला , विज्ञान व वाणिज्य कनिष्ठ महाविद्यालय,कोरेगाव परिसर, पिंगळी रोड , परभणी	क्रॉप सायन्स	१ तुकडी
४५	तुळजाई ग्रामीण विकास संस्था शेलेवाडी ता.लोहा जि.नांदेड संचलीत केंब्रीज (स्व) कनिष्ठ महाविद्यालय,वसमत ता.वसमत जि.हिंगोली	क्रॉप सायन्स	१ तुकडी (दुसरी)
४६	चंद्रगीरी शिक्षण प्रसारक मंडळ पार्डी (सा) ता.औंढा (ना) जि.हिंगोली संचलीत चंद्रगीरी उच्च माध्यमीक विद्यालय, येळीफाटा ता.औंढा (ना), जि.हिंगोली	क्रॉप सायन्स	१ तुकडी
४७	कै.महिपती बापु शिक्षण व ग्रामविकास संस्था, आडगाव ता.जि.हिंगोली संचलीत श्री छत्रपती शाहू महाराज माध्यमीक व उच्च माध्यमीक विद्यालय,आडगाव, ता.जि.हिंगोली	क्रॉप सायन्स	१ तुकडी
४८	जिजामाता शिक्षण संस्था,हिंगोली द्वारा संचलीत सुखदेवानंद कला व विज्ञान उच्च माध्यमीक विद्यालय, भांडेगाव, ता.जि.हिंगोली	क्रॉप सायन्स	१ तुकडी
एकूण २९ संस्था		**एकूण ३१ तुकडया**	

	अमरावती विभाग		
४९	श्री. योगीराज फाऊडेशन स्व. उमाकांत मस्कुजी बुरुंगले कला वाणिज्य व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय वरवट रोड ,शेगांव, जि. बुलढाणा	फ्रेश वॉटर फिश कल्चर	१ तुकडी
		बँकींग	१ तुकडी
५०	शिवगंगा बहुउद्देशिय शैक्षणिक संस्था रामनगर जालना, व्दारा संचलित आदर्श कला वाणिज्य व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय सिनगाव जहाँ,ता. दे.राजा, जि. बुलढाणा	क्रॉप सायन्स	१ तुकडी
५१	साधना शिक्षण मंडळ शेगाव संचलित सरस्वती कनिष्ठ महाविदयालय, शेगांव, जि . बुलढाणा	कॉम्प्युटर सायन्स	१ तुकडी
५२	बुलढाणा अर्वण चॅरिटेबल सोसायटी बुलढाणा व्दारा संचलित सहकार ज्युनिअर कॉलेज ऑफ सायन्स बुलढाणा, जि. बुलढाणा	क्रॉप सायन्स	१ तुकडी
		कॉम्प्युटर सायन्स	१तुकडी
५३	उम्मे सलमा माइनॉरीटी एज्युकेशन ॲण्ड वेलफेअर सोसायटी अकोला व्दारा संचलित रहेबर ज्युनिअर कॉलेज ऑफ सायन्स ॲण्ड कॉमर्स एम. एम. रोड फिरदौस कॉलनी, ता. जि. अकोला	फ्रेश वॉटर फिश कल्चर	१ तुकडी
	एकूण ५ संस्था	**एकूण ७ तुकडया**	
	नागपूर विभाग		
५४	ज्ञान विज्ञान वर्धिनी १८५, त्रिमुर्ती नगर, नागपूर व्दारा संचलित टिपटॉप कॉनव्हेंट सेंकेडरी अँण्ड हायर सेंकेंडरी स्कूल दिनदयाल नगर, नागपूर	कॉम्प्युटर सायन्स	१ तुकडी
५५	राधास्वामी विविध कार्यकारी शैक्षणिक संस्था व्दारा संचलित आदर्श संस्कार विदयालय व ज्यूनियर कॉलेज पिपळा , नागपुर	कॉम्प्युटर सायन्स	१ तुकडी
५६	महेश विद्याप्रसारक शिक्षण संस्था व्दारा संचलित आदर्श संस्कार विद्यालय, ज्युनिअर कॉलेज, वृंदावन श्रीकृष्ण नगर चौक, हसनबाग रोड, नागपूर	फ्रेश वॉटर फिश कल्चर	१ तुकडी
५७	तिरुपती बहुउद्देशिय संस्था, सुदाम मठ इतवारी नागपूर व्दारा संचलित बालाजी ज्यु.कॉलेज बुटीबोरी,जि. नागपूर	फ्रेश वॉटर फिश कल्चर	१ तुकडी
	एकूण ४ संस्था	**एकूण ४ तुकडया**	
	एकूण ५७ संस्था	**एकूण ८२ तुकडया**	

<u>अटी व शर्ती.</u>

१. संबंधित संस्थेस माध्यमिक शाळा संहिता १९८१ मध्ये नमूद केलेल्या सर्व अटी व शर्तीची पुर्तता करणे बंधनकारक राहील.

२. मान्य अभ्यासक्रमांच्या नवीन / अधिकच्या तुकडया सुरु करण्यास कायमस्वरुपी विनाअनुदानित तत्वावर मान्यता दिली असली तरीही, भविष्यात कोणत्याही प्रकारचे अनुदान अथवा आर्थिक मदत देण्यांत येणार नाही.

३. मान्य अभ्यासक्रम राबविणा-या संस्थांना शासन / संचालनालय / संचालनालयाच्या अखत्यारितील संबंधित कार्यालये यांच्या कडून वेळोवेळी निर्गमित होणा-या आदेशांचे पालन करणे बंधनकारक राहील.

४. शासनाने वेळोवेळी निश्चित केलेले शिक्षण शुल्क विद्यार्थ्यांकडून आकारणे संस्थेस बंधनकारक राहील.

५. **कायमस्वरुपी विनाअनुदान तत्वावर मान्यता मिळालेले +२ स्तरावरील द्विलक्षी व्यवसाय अभ्यासक्रम"** असा सुचना फलक संस्थांनी दर्शनी भागावर लावणे बंधनकारक राहील. सुचना फलकावर अभ्यासक्रमांच्या मंजूर तुकडयांची संख्या व मंजूर प्रवेश क्षमता याचा उल्लेख करण्यात यावा.

६ मान्यतेचे आदेश निर्गमित झाल्यानंतर संबधित संस्थेने मंजुर अभ्यासक्रमासाठी मानकानुसार आवश्यक असलेल्या सर्व पायाभूत सुविधा एक महिन्याच्या कालावधी मध्ये उपलब्ध करणे बंधनकारक राहील.

७. सदर अभ्यासक्रमांना कायमस्वरुपी विनाअनुदान तत्वावर मान्यता देण्यात आल्यामुळे या अभ्यास-क्रमाकरिता संस्थेने नियुक्त केलेल्या सर्व कर्मचारी वर्गाची सेवा / वेतन व तदनुषंगिक बाबींची जबाबदारी सर्वस्वी संबंधित संस्थेची राहील, याबाबत शासन कोणतीही जबाबदारी घेणार नाही.

८. मंजूर अभ्यासक्रमांकरिता आवश्यक कर्मचा-यांच्या नियुक्त्या, त्याची किमान शैक्षणिक अर्हता, अनुभव याबाबत संस्थेने महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) नियमावली १९८१ मधील तरतुदीनुसार तसेच शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार कार्यवाही करण्यात यावी.

९. भविष्यात सदरचे अभ्यासक्रम बंद करण्याबाबत किंवा त्यात काही बदल करण्याबाबत शासनाने निर्णय घेतल्यास तो विनाअट, विनाविलंब संस्थेने अंमलात आणणे आवश्यक राहील.

१०.अभ्यासक्रमांच्या मंजूर तुकडयांमधील प्रवेशाकरिता शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेले सामाजिक/ समांतर आरक्षण व इतर नियमांचे संस्थांनी काटेकोरपणे पालन करावे व गुणानुक्रमे प्रवेश देण्यांत यावे.

११.अभ्यासक्रमांना मंजूरी मिळाल्यानंतर सदर अभ्यासक्रम संस्थेस सुरु केल्याबाबतची माहिती संस्थेने महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक परिक्षा मंडळास तात्काळ द्यावी, त्याबाबतची अनुषंगिक कार्यवाही करावी.

१२.मान्यता देण्यात आलेल्या अभ्यासक्रमाच्या अधिकच्या / नवीन तुकडयांची प्रवेश क्षमता प्रती तुकडी ५० असुन शैक्षणिक वर्ष २०१७-१८ नंतरचे मंजूर प्रवेशक्षमतेच्या ५०% पेक्षा कमी प्रवेश झाल्यास अशा तुकडया सुरु ठेवण्याकरिता संबंधित जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी यांची परवानगी घेणे बंधनकारक राहील. त्याचप्रमाणे सलग ०३ शैक्षणिक वर्षामध्ये मंजूर प्रवेशक्षमतेच्या ५०% पेक्षा कमी प्रवेश झाल्यास सदर अभ्यासक्रमाची तुकडी बंद करण्याची कार्यवाही करण्यात येईल.

१३.संबंधित संस्थेने त्यांच्याकडे भाषा / जीवशास्त्र इत्यादी विषयाचे शिक्षक, मंजूर केलेल्या द्विलक्षी अभ्यासक्रमाच्या तुकडीमुळे अतिरिक्त ठरणार नाहीत याची खातरजमा करुनच विद्यार्थ्यांना प्रवेश द्यावा.

१४.शैक्षणिक गुणवत्ता वाढविण्यासाठी उपरोक्त अटी व शर्तीमध्ये बदल करण्याचे किंवा नविन अटी व शर्ती अंतर्भुत करण्याचे अधिकार शासनाचे राहतील .

१५. +२ स्तरावरील द्विलक्षी व्यवसाय अभ्यासक्रमाच्या तुकड्यामध्ये विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यापुर्वी संचालक यांचेकडुन स्थानिक स्तरावर समिती नेमुन समितीच्या सर्वंकष निरीक्षणानुसार प्राप्त अहवालाप्रमाणे संचालनालयाच्या परवानगीने प्रवेश देण्यात यावेत. तद्नंतर सर्व संबधित संस्थांकडुन शासनाने विहीत केलेले सर्व निकष व अटी/शर्तींची पुर्तता होत असल्याबाबत संचालक यांनी सातत्याने निरीक्षण करुन आढावा घेण्यात यावा.

१६.+ २ स्तरावरील व्दिलक्षी व्यवसाय अभ्यासक्रमांना मान्यता देण्यात आलेल्या संस्थेने शासन आदेशाच्या दिनांकापासून **दोन वर्ष कालावधीत अभ्यासक्रम सुरु न केल्यास**, व्यवसाय अभ्यासक्रम मान्यता आपोआप संपुष्ठात येईल, याची संबंधीत संस्थेने नोंद घ्यावी.

१७.व्यवसाय अभ्यासक्रमांतर्गत मंजूर व्यवसाय अभ्यासक्रमाच्या / मंजूर तुकडीनुसार प्रवेशक्षमतेपेक्षा अतिरिक्त अनधिकृत प्रवेश केल्यास शासनाने सन २०१३ या महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २० राजपत्र दिनांक २१.०८.२०१३ रोजी प्रसिध्द झालेल्या अधिनियमान्वये अनधिकृत संस्था स्थापन करण्यास अथवा अनधिकृत पाठयक्रम सुरु करण्यास मनाई करण्यात आलेली आहे, याची संबंधीत संस्थेने नोंद घ्यावी.

शैक्षणिक वर्ष २०१८-२०१९ मध्ये मान्यता दिलेल्या उपरोक्त तक्त्यातील किती संस्थांनी व्यवसाय अभ्यासक्रम सुरु केले, याबाबत तसेच अभ्यासक्रम निहाय प्रवेशित विद्यार्थी संख्या याबाबतची माहिती संचालक,(व्यशि व प्रशि) यांनी शासनास दिनांक ३१/१०/२०१८ पर्यंत सादर करावी.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेताक क्र. २०१८०२०२१६३८५३२९०३ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Sakharam Dina Kharat

Digitally signed by Sakharam Dina Kharat
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=SD And E Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=c6d1f4d2e41b8e84bb98ddddcac3054927f82f9c1a5810e2874cdac2c44c28c2, cn=Sakharam Dina Kharat
Date: 2018.02.02 16:42:35 +05'30'

(स. दि. खरात)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य मुंबई-१
२) सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक, (शालेय शिक्षण विभाग),(व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयामार्फत.)
३) सहसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, प्रादेशिक कार्यालय, मुंबई, पुणे,नाशिक, औरंगाबाद,अमरावती व नागपूर (व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयामार्फत.)
४) संबंधित जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी (व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयामार्फत.)
५) संबंधित अशासकीय संस्था (व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयामार्फत.)
६) मा. मंत्री (कौ.वि.व उ.) यांचे खाजगी सचिव यांना माहितीसाठी सादर.
७) मा. राज्यमंत्री (कौ.वि.व उ.) यांचे खाजगी सचिव यांना माहितीसाठी सादर.
८) मा. विरोधी पक्षनेता, विधान परिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
९) मा. विरोधी पक्षनेता, विधान सभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
१०) मा. सचिव, कौशल्य विकास व उद्योजकता विभाग यांचे स्वीय सहायक.
११) मा. प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग यांचे स्वीय सहायक.
१२) उप सचिव , कौशल्य विकास व उद्योजकता विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
१३) निवड नस्ती (व्यशि-४).